कार्यालयीन परिपत्रक क्र. 20

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
कामगार व जनता संपर्क कार्यालय
दिनांक: 22 /०७/२०२१

# कार्यालयीन परिपत्रक

**विषय : समूह वैयक्तिक अपघात विमा योजना वार्षिक वर्गणी कपात करणेबाबत.**

**संदर्भ : मा. अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांची दिनांक ०६/०५/२०२१ रोजीची मान्यता.**

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरीता अपघातामुळे मृत्यु आल्यास अथवा कायम स्वरूपाचे अपंगत्व/विकलांगता आल्यास व त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या उपजिविकेस धोका निर्माण झाल्यास त्याला ठोक रक्कमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई देण्याकरीता शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी अपघात विमा योजना संदर्भाकिंत शासन आदेशान्वये दि. ०१/०४/२०१६ पासून सुरू करण्यात आली आहे. शासनाने याबाबत दिलेली योजनेची ठळक वैशिष्टये पूढीलप्रमाणे आहेत.

१. वैयक्तिक अपघात गट – अ ते ड मधील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू असेल.
२. वैयक्तिक अपघात योजनेची राशीभूत विमा रक्कम रू. १० लाख इतकी असेल.
३. अपघातामुळे आलेला मृत्यु, कायमचे अपंगत्व / विकलांगता किंवा दोन हात, दोन पाय किंवा दोन्ही डोळे गमावून अपंगत्व / विकलांगता आल्यास त्यास १०० टक्के लाभ अनुज्ञेय असेल.
४. कायमचे अंशतः अपंगत्व / विकलांगता आल्यास अपंगत्वाच्या स्वरूपानुसार लाभाची टक्केवारी विहित करण्यात आली आहे.

या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

अ. पुणे महानगर परिवहन महामंडळातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे माहे जुलै पेड इन ऑगस्ट चे वेतनातून सन २०२१ – २०२२ या आर्थिक वर्षासाठी समूह अपघात विमा वार्षिक वर्गणी रू. १७५/– कपात करण्यात यावी.

ब. पुणे महानगर परिवहन महामंडळातील आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या माहे जुलै पेड इन ऑगस्ट चे वेतनातून कपात न केल्यास वा कमी वर्गणी कपात केल्यामुळे संबंधित व्यक्ती लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित वेतनपत्रक लेखनिक व आहरण व संवितरण अधिकारी (पगारपत्रकावर स्वाक्षरी करणारे) यांची राहिल याची नोंद घ्यावी.

समूह वैयक्तिक अपघात विमा योजनेची रक्कम रू. १७५/– वर्गणी कपात न करणे, कमी कपात करणे, प्रलंबित वर्गणी अन्य / अंतिम देय रक्कमेतून कपात करणे या व अशा सर्व बाबीस वेतनपत्रक लेखनिकास जबाबदार धरून त्याचे विरूध्द शास्तीची कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील सर्व सूचनांचे सर्व पगारपत्रक लेखनिकांनी कटाक्षाने पालन करावयाचे असून सर्व अधिकारी / कर्मचारी यांची समूह अपघात विमा योजना वार्षिक सभासद वर्गणी कपात होईल याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी कटाक्षाने नोंद घ्यावी.

20/7/21

सहव्यवस्थापकिय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

Ok

प्रत

१) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक

२) मा. सहव्यवस्थापकिय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
यांजकडेस माहितीसाठी

३) सर्व डेपो मॅनेजर / डी.एम.ई. / विभागप्रमुख, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
यांजकडेस माहिती व जरूर त्या कार्यवाहीसाठी रवाना ................

4) Computer dept to put on website. /Portal

5) CAFO

6) CIA

7) Pay Bill